महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघामार्फत शेतमालाची खरेदी करण्यासाठी लागलेल्या अनुषांगिक खर्चाची रक्कम अदा करण्याकरिता अर्थसहाय्य या योजनेसाठी नवीन लेखाशीर्ष उपलब्ध करुन देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

शासन निर्णय क्रमांक: सपस-२०१८/प्र.क्र.१०३/२४ स

मंत्रालय, विस्तार, मुंबई-३२

दिनांक:- ३० मे, २०१८

<u>संदर्भ</u>:- (१) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक:- सपस-२०१७/प्र.क्र.७७/२४-स, दिनांक २७.०४.२०१७, १६.०५.२०१७ व २६.०५.२०१७

(२) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग, क्रमांक:- सपस-२०१७/प्र.क्र.१९८/२४-स, दिनांक २५.१०.२०१७

(३) शासन निर्णय, वित्त विभाग,क्रमांक :- शाहमी-२०१७/सपववि/प्र.क्र. ४२/अर्थबळ, दिनांक २८.४.२०१७, १२.६.२०१७, ५.७.२०१७, २१.७.२०१७ व १३.९.२०१७

<u>प्रस्तावना:-</u>

सन २०१७-१८ मध्ये अनुकूल हवामान व मान्सुनचा समाधानकारक पाऊस यामुळे राज्यात तुरीचे माठ्या प्रमाणावर उत्पादन झाले होते. केंद्र शासनाच्या किंमत स्थिरता निधी योजनेअंतर्गत ५ लाख मे.टन तुरीची खरेदी केल्यानंतरही खरेदी केंद्रावर टोकन दिलेल्या शेतकऱ्यांची तूर मोठ्या प्रमाणात शिल्लक होती. राज्यातील तुरीच्या मुबलक उत्पादनामुळे शेतक-याला मिळणारा कमी बाजारभाव विचारात घेता, शेतक-यांना सहाय्य करण्यासाठी शासनाने बाजार हस्तक्षेप योजनेअंतर्गत तूर खरेदी करण्याचा निर्णय शसन निर्णय दिनांक २७.४.२ ०१७ अन्वये घेण्यात आला. सदर योजना राबविण्यासाठी पणन महासंघास अभिकर्ता संस्था म्हणून नियुक्त करण्यात आले होते. अशा प्रकारची योजना राज्यात पहिल्यांदाच राबविण्यात येत असल्याने, सदर योजनेसाठी होणा-या खर्चाकरिता अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध नव्हती. यासाठी वित्त विभागाने पणन महासंघास वेळोवेळी मंजूर केलेली शासन हमी एकूण रु. १४९३ कोटी आहे.

सदर शासन हमीवर पणन महासंघाने इंडियन बँक, शाखा मांडवी व युनियन बँक, शाखा भात बाजार यांचेकडून रु.१४९३.०० कोटी इतक्या कर्जाची उचल केलेली आहे. सदर निधीतून पणन महासंघाने तूर खरेदीचे चुकारे व अनुषंगिक खर्चाची रक्कम अदा केलेली आहे. बँकाकडून पणन महासंघाने घेतलेल्या कर्जावर ८.०५ % दराने व्याज अदा करावयाचे आहे. सदर कर्जाची परतफेड तूर किंवा तूरडाळ विक्रीतून पणन महासंघाने करावयाची आहे. तथापि, या प्रकियेस बराचसा

कालावधी लागणार असल्याने बँकाकडील व्याजाच्या रकमेत वाढ होणार आहे. कर्जाची परतफेड करण्यासाठी पणन महासंघास एकरकमी रक्कम राज्य शासनाकडून उपलब्ध करुन द्यावयाची आहे. सदर योजना राज्यात प्रथमच राबविली असून सदर योजनेसाठी अर्थसंकल्पिय तरतूद केलेली नाही अथवा स्वतंत्र लेखाशिर्षही घेण्यात आलेले नाही. राष्ट्रीयीकृत बँकाकडून घेजलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी व भविष्यात अशाच प्रकारची परिस्थिती उद्भवल्यास पणन महासंघास निधी उपलब्ध करुन देण्याकरिता नवीन लेखाशीर्ष उपलब्ध करुन घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघामार्फत शेतमालाची खरेदी करण्यासाठी लागलेल्या अनुषांगिक खर्चाची रक्कम अदा करण्याकरिता अर्थसहाय्य या योजनेंतर्गत पणन महासंघास निधी उपलब्ध करुन देण्यासाठी पुढीलप्रमाणे नवीन लेखाशीर्ष उपलब्ध करुन देण्यात येत आहे:-

मागणी क्र. व्ही-२

२४२५ सहकार

००

१९५ सहकारी संस्थांना अर्थसहाय्य

(०१) सहकारी संस्थांना अर्थसहाय्य

(०१)(०४) महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघामार्फत शेतमालाची खरेदी करण्यासाठी लागलेल्या अनुषांगिक खर्चाची रक्कम अदा करण्याकरिता अर्थसहाय्य (अनिवार्य)(२४२५ २५४२)

३३ अर्थसहाय्य

Demand No. V-2

2425 Co-operation

00

195 Assistance to co-operatives

(01) Assistance to co-operatives

(01)(04) Subsidy to Maharashtra State Co-operative Marketing Federation Ltd. For ancillary expenditure on Account of purchase of farmers Produce (Committed)(2425 2542)

33 Subsidies

२. सदर शासन निर्णय महालेखापाल, मुंबई यांच्या कार्यालयाचा क्र. ख.वि/चा-१/सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग/यूओआर-७/२०१८-१९/१४५ दिनांक १/५/२०१८ च्या पत्रान्वये दिलेल्या मान्यतेने आणि वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १४२/अर्थ-१३, दिनांक १७/५/२०१८ अन्वये मिळालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०६०११२२१२९४५०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Ghadyale Sunanda Mohanrao

Digitally signed by Ghadyale Sunanda Mohanrao
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-operation, Marketing and Textiles, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fd89208cbc27b202c96467165ac5bc9643515d80ba9edecaf650dad6e8311b45, cn=Ghadyale Sunanda Mohanrao
Date: 2018.06.01 12:21:29 +05'30'

(सुनंदा मो.घडयाळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

प्रति,

१. व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या. मुंबई
२. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
४. सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था
५. सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था
६. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा. मंत्री (सहकार, पणन व वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
८. मा. राज्यमंत्री (पणन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
९. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१०.अपर मुख्य सचिव(पणन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
११. महालेखापाल, महाराष्ट्र-१ /२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा), मुंबई/नागपूर,
१२.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१३.जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे,
१४.वित्त विभाग, व्यय-२/अर्थसंकल्प-१३, मंत्रालय, मुंबई-३२
१५.कार्यासन अधिकारी, १७ स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६.निवड नस्ती २४ स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.